NEHRU BAL PUSTAKALAYA

# मंगूचा भोवरा

कामाक्षी बालसुब्रह्मण्यन्

अनुवाद

**विनय तट्टे**


चित्रे

**अमिताभ सेनगुप्ता**



ISBN 81-237-0614-6

पहिली आवृत्ती 1992 (शके 1914)
चौथी आवृत्ती 2002 (शके 1923)
© कामाक्षी बालसुब्रह्मण्यम्, 1990
Mangu's Top (*Marathi*)
रु. 11.00
संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया,
ए-5 ग्रीन पार्क, नवी दिल्ली-110016
यांनी प्रकाशित केले.



नेहरू बाल पुस्तकालय


# मंगूचा भोवरा


कामाक्षी बालसुब्रह्मण्यन्

अनुवाद
**विनय तट्टे**

चित्रे
**अमिताभ सेनगुप्ता**

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया







# मंगूचा भोवरा

मंगूला एक खेळणं हवं होतं. असं खेळणं की, ज्यात खूप मजा येईल. आकर्षक, गंमतीदार, नवं कोरं खेळणं त्याला पाहिजे होतं. त्यासाठी तो हट्ट धरून बसला होता.

पण त्याच्याजवळ खेळणं विकत घेण्यासाठी पैसेच नव्हते. त्याच्या आईवडिलांना वाटायचं, घ्यावं एखादं खेळणं त्याच्यासाठी, एवढा हट्ट धरून बसला आहे तर.

मंगू आपल्या झोपडीसमोर बसायचा. इतर मुलं खेळत असताना बघायचा. त्यांच्याजवळ भोवरे होते, गोट्या होत्या, पतंग होते. ते सारे मजा करायचे, खिदळायचे, डाव जिंकायचे, हारायचे.






मंगू मात्र एकटा असायचा.

संध्याकाळ झाली की, सारी मुलं घरी जायची. मंगू मात्र बसल्या जागीच बसून राहायचा.

आणि एकदम त्याला काही दिसलं. भोवरा.

एका मोठया दगडाच्या बाजूला कोपऱ्यात पडलेला होता.







मंगूने भोवरा उचलला.

जुना भोवरा होता तो. त्याचा रंग पार उडून गेला होता. टवके उडाले होते. पण तरीही तो भोवराच होता ना.


मंगूनं तो घरी आणला. त्यानं त्या भोवऱ्याला एक दोरी गच्च गुंडाळली आणि दिला झोकून जमिनीवर.






भोवरा गरगरा फिरायला लागला. पण तो कसा हिरमुसल्यासारखा दिसत होता. त्याचे टवके उडाल्यामुळे आणि रंग उडाल्यामुळे.

मंगूला वाटलं भोवरा कसा थकल्या-सारखा दिसतोय. आजारी आहे वाटतं.






त्यानं त्याला उचललं आणि त्याच्याकडे निरखून बघितलं.


एक फडकं घेऊन त्यानं तो भोवरा स्वच्छ पुसून काढला. मग त्यानं एक विटकरीचा तुकडा घेतला आणि त्याला घासून पुसून गुळगुळीत केला.

आता टवके जरा कमी दिसत होते. मंगूने विचार केला भोवऱ्याला आपण तेल लावू या. रंगवू या.


त्याच्या आईनं त्याला थोडंसं चमचाभर तेल दिलं.








त्याच्या वडिलांनी आपल्या मित्राकडून थोडासा रंग मागून आणला.








सकाळी मंगूनं आपलं काम सुरु केलं.

तेलानं भोवऱ्याला चमक आली.

रंग लकाकू लागले.


भोवरा उन्हात ठेवला. सुकण्यासाठी. त्याला सुकायला एक पूर्ण दिवस आणि रात्र पाहिजे होती.




रात्र झाली. मंगू अंथरूणावर पडला. त्याला झोप लागली. झोपेत त्याला भोवऱ्याचीच स्वप्नं पडायला लागली.

जागं झाल्यावर त्याला दिसलं, त्याचा भोवरा त्याच्याजवळच होता. मंगूला झोप लागल्यावर जणू तो घरंगळत त्याच्याकडे सरकला.


मंगूनं त्याच्याकडं मोठ्या कौतुकानं पाहिलं. किती छान दिसत होता तो. केवढे सुंदर होते त्याचे रंग !






पण हे काय ? भोवऱ्याला हे छिद्र कसं पडलं. या टोकापासून ते त्या टोकापर्यंत. हे कांही केवळ पृष्ठभागावर पडलेलं मामुली छिद्र नव्हतं. कदाचित भोवरा पुन्हा कधी फिरणारच नाही.


मंगू फार कष्टी झाला. त्याला आठवलं, काल तर कसा गरगरा फिरत होता. त्यानं भोवऱ्याला दोरी गुंडाळली आणि ताणून खाली फेकला.






भोवरा किती मजेत फिरला. रंग कसे चमकत होते. उन्हात तो चमचम करीत होता. गंमत म्हणजे, आता तो शिट्टीसुध्दा वाजवायला लागला. छिद्रातून वारा गेला की, भोवरा जणू शीळच घालतो आहे, असं वाटायचं.

मंगूला आता आपला स्वत:चा भोवरा मिळाला होता. शिट्टी वाजवणारा, गरगर फिरणारा भोवरा.





Printed at Shagun Offset, Quality Printer, New Delhi-66.

रु. 11.00 ISBN 81-237-0614-6

नेशनल बुक ट्रस्ट, इंडिया

